# Visual MELODY

THE RAVI PARANJAPE STUDIO

E-Magazine About Visual Arts In free india
By - The Ravi Paranjape Studio

Volume 20 - Quarterly Issue - 1st December 2024

5th Year of Visual Melody E-Magazine



**Special Edition**

Western Classicism
Art of **Wassily Kandinsky**

All paintings and illustrations used in this issue are duly acknowledged.

***"Absorb the beauty and present it beautifully"***

*Ravi Paranjape*

# Visual
# MELODY

Visual Melody is a content-rich Free quarterly E- Magazine offered by The Ravi Paranjape Studio, dedicated to great Indian artists of the past and present generations.

*This FREE e-magazine is published quarterly in Marathi and English.*

*Visual Melody **FREE** subscription link:*
[https://www.raviparanjape.org/emagazine](https://www.raviparanjape.org/emagazine)

***The Ravi Paranjape Studio***
*'The Ravi Paranjape Studio' is a privately operated group. The group's objective is to promote the 'Design Based Culture' envisioned by Artist Ravi Paranjape, through several initiatives run at the studio's art gallery and exhibition space located in Model Colony, Pune.*


***Credits***
*Editor: Rahul Deshpande*
*Art Direction: Sunil Gokarn*
*Design : Vinayak Chhatre*
*Project Coordinator: Varsha Pendse*



*1 Rutika, 1098/5-A, Model Colony,*
*Shivaji Nagar, Pune - 411016*

*+91 942 356 2530*
[www.raviparanjape.org](http://www.raviparanjape.org)
[abhijatkala@gmail.com](mailto:abhijatkala@gmail.com)



*All published information and images in this e-magazine are duly acknowledged and copyright protected by the respective parties.*
*This e-magazine is free to share as is. No part of this e-magazine shall be reproduced or shared in parts or used in any other way than intended.*

5th Year of Visual Melody E-Magazine

## THE 5TH YEAR OF VISUAL MELODY!

Celebrating the 5th year of 'Visual Melody,' the FREE quarterly e-magazine offered by 'The Ravi Paranjape Studio'. 'Visual Melody' introduces you to brilliant Indian artists from various facets of visual art from the past and present generations. We are pleased to present the first issue of the fifth year of Visual Melody, featuring artist-cartoonist-caricaturist 'Mario Miranda'. This issue is published today on March 1, 2024 at raviparanjape.org/emagazine.

The inaugural issue of 'Visual Melody,' dedicated to the legendary painter Madhavrao Satavlekar, was launched on October 8th, 2019 under the auspices of Shri. Ravi Paranjape, commemorating his 84th birthday. Since 2020, the e-magazine featured one phenomenal artist each quarter– Shri K.B. Kulkarni, Shri N.S. Bendre, Shri Dinanath Dalal, Shri Gopalrao Deuskar, Shri Ravindra Mestry, Shri S.M. Pandit, Shri Ravi Paranjape, Shri S.D. Phadnis, Shri G.S. Majgaonkar, Shri Shivaji Tupe, Shri Datta Padekar, Shri Maruti Patil, Shri Madan Garge, Shri Charuhas Pandit, Shri Chintamani Hasabnis, and Shri Arvind Mestry. All of these issues are available at raviparanjape.org/emagazine for your enjoyment.

The creative team behind Visual Melody looks forward to continue bringing artistic brilliance to you through this publication. The exquisitely designed Visual Melody is published in English and Marathi in the same issue.

## 'व्हिजुअल मेलडी' ई-अंकाचं पाचव्या वर्षात यशस्वी पदार्पण.

द रवी परांजपे स्टुडियो तर्फे प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या 'व्हिजुअल मेलडी' या विनामूल्य ई-अंकाचं हे पाचवं वर्ष सुरु होत आहे. दृष्य कलेच्या विविध शाखांमधल्या, कालच्या आणि आजच्या पिढीतल्या अग्रणी कलाकारांची ओळख 'व्हिजुअल मेलडी' या अंकातून करून दिली जाते. 'व्हिजुअल मेलडी' च्या पाचव्या वर्षाचा शुभारंभ आज १ मार्च २०२४ ला प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकातून सुप्रसिद्ध चित्रकार-व्यंगचित्रकार श्री. मारियो मिरांडा यांच्या कलेला दिलेल्या आदरांजलीने करत आहोत.

ज्येष्ठ चित्रकार श्री. माधवराव सातवळेकर यांना मानवंदना देणारा 'व्हिजुअल मेलडी' चा पहिला अंक ८ ऑक्टोबर २०१९ साली श्री. रवी परांजपे सरांच्या ८४ व्या वाढदिवसाचं औचित्य साधत प्रसिद्ध झाला. त्यानंतर २०२० सालापासून प्रत्येक तिमाहीला एकेका दिग्गज कलाकाराची ओळख करून देणारे 'व्हिजुअल मेलडी' चे अंक प्रसिद्ध केले गेले, त्यात या अत्यंत गुणी कलाकारांचा समावेश आहे – श्री. के. बी. कुलकर्णी, श्री. एन. एस. बेंद्रे, श्री. दिनानाथ दलाल, श्री. गोपाळराव देऊस्कर, श्री. रवींद्र मेस्त्री, श्री. एस. एम. पंडित, श्री. रवी परांजपे, श्री. शि. द. फडणीस, श्री. जी. एस. माजगावकर, श्री. शिवाजी तुपे, श्री. दत्ता पाडेकर, श्री. मारुती पाटील, श्री. मदन गर्गे, श्री. चारुहास पंडित, श्री. चिंतामणी हसबनीस, आणि श्री. अरविंद मेस्त्री. हे सर्व अंक raviparanjape.org/emagazine या ठिकाणी सर्व कालारसिकांसाठी उपलब्ध आहेत.

'व्हिजुअल मेलडी' चं संपादक मंडळ अशाच गुणी कलाकारांची ओळख तुमच्या पर्यंत पोचवायला कायम प्रयत्नशील राहील. 'व्हिजुअल मेलडी' चा अत्यंत सुबक आणि देखणा ई-अंक दर तीन महिन्याला इंग्लिश आणि मराठी अशा दोन भाषांत प्रसिद्ध होतो.

# या अंकात

पेंटर-इलसट्रेटर श्री. रवी परांजपे यांची अभिजाततेच्या निकषांवर आधारलेली विचारसरणी त्यांच्या लिखाणात आणि कलाविष्कारात प्रकर्षाने दिसून येते. कालातीत आणि मूलभूत मूल्यांचा सखोल अभ्यास हा सर्जकतेचा पाया यावर त्यांचा दृढविश्वास होता.

'व्हिजुअल मेलडी' या स्वतंत्र भारतात फुललेल्या कलेला आणि कलाकारांना वाहिलेल्या त्रैमासिकाचा विशेषांक अंक आपल्या हातात देताना आनंद होतो आहे. कित्येक भारतीय कलाकारांच्या कारकिर्दीवर इम्प्रेशनिझाम, क्युबिझम, ॲबस्ट्रॅक्ट एक्सप्रेशनिझाम अशा चळवळींचा मोठा प्रभाव दिसतो, म्हणून या विशेषांकाच्या निमित्ताने पाश्चात्य अभिजातता आणि अमूर्त कलाविचाराच्या उदयाचा आढावा घेत आहोत.

त्या अनुषंगाने, रवीजींच्या 'भारत- काल, आज आणि उद्या', आणि 'शिखरे रंग रेषांची' या पुस्तकांमधले दोन लेख या अंकात पुनर्मुद्रित करत आहोत. या लेखांमधून रवीजींचे पाश्चात्य अभिजाततेसंबंधी विचार आणि, 'ॲबस्ट्रॅक्ट आर्ट' चा जनक मानल्या जाणाऱ्या वॅस्सिली कॅन्डिन्स्की, या जगभरातल्या अनेक कलाकारांना भुरळ घालणाऱ्या आणि प्रेरित करणाऱ्या कलाकाराच्या कारकिर्दीचा मागोवा घेताना, प्रयोगशीलतेतून निर्माण होणाऱ्या उन्नती विषयीची रवीजींची वैचारिक प्रगल्भता दिसून येते.

# In this edition

Painter-illustrator Ravi Paranjape's philosophy focuses on Classicism (Abhijatata). Through his writing and art, he has emphasized that a deep understanding of timeless classical values forms the foundation of every creative pursuit.

We are pleased to present this special edition of Visual Melody, an e-magazine dedicated to the art and artists of India. The artistic evolution of many Indian artists from the post-independence era has been significantly shaped by Western art movements such as Impressionism, Cubism, and Abstract Expressionism. In this edition, we take the opportunity to reflect on the origins of Western Classicism and trace the emergence of abstract art.

In this context, we reprint two articles authored by Raviji from his books 'Bharat-Kaal, Aaj ani Udya' and 'Shikhare Ranga Reshanchi'. These articles highlight Raviji's thoughts on the roots of Western Classicism and his open-minded approach to artistic experimentation and growth, exemplified through his exploration of Wassily Kandinsky's art. Kandinsky, a forefather of modern abstract art, created works that have charmed and inspired generations of artists worldwide.

# ARTIST
# RAVI PARANJAPE & CLASSICISM

For artist Ravi Paranjape, Classicism (Abhijatata) was a guiding philosophy that shaped his creations, emphasizing discipline and balance.





Deeply rooted in tradition, yet ever-evolving, Raviji's art exemplified the harmonious balance between forms, colors, and eternal beauty, taking **classical realism** to the next level.

Raviji was an ardent supporter of relentless training in drawing and sketching until it became second nature. He stressed continuing the practice, just like a master musician continues riyaaz regardless of their command of the art form. Raviji believed that mastering fundamental principles is essential for any artist to introspect and create works that resonate across generations.

**Raviji often emphasized that an artist should study the past not to replicate it, but to draw inspiration from, and understand the enduring values that define great art.** While Raviji's methodology and technical precision resemble the qualities of Renaissance art, his subject matter aligns with the Impressionist ideals of capturing the world around him. **The combination of classical technique, subject choices, and unique stylization render many of his works as 'timeless classics' (Abhijaat) in their own right.**

Raviji advocated the study of classical art forms not as a limitation to aspiring artists but as a foundation to build their creative vocabulary. **He pointed out that several celebrated modern artists like Picasso, Matisse, and Cezanne, known for their progressive approaches, owe their artistic development to the classical traditions from which they originated.**

Through his works and teachings, Raviji demonstrated that true art lies in the enduring exploration of eternal ideals that help the art and artist to evolve.

**Raviji's vast oeuvre reminds us that ephemeral trends may come and go, but the essence of classicism—the pursuit of excellence, profound expression, and ingenuity—remains the backbone of creativity.**



-Varsha Pendse



# पाश्चिमात्य अभिजाततेचा आरंभ

इ.स. पूर्व २०० ते ५०० हा एकेकाळच्या बलाढ्य रोमन साम्राज्याचा काळ. तत्पूर्वी म्हणजे इ.स. पूर्व २०० च्या आधीची ३०० वर्ष ते 'रिपब्लिक' च्या स्वरूपात अस्तित्वात होतं. त्याचं साम्राज्य बनलं इ.स. पूर्व २०० च्या सुमारास आणि पतन झालं इ.स. ५०० च्या सुमारास. प्रथम त्या साम्राज्याचे पूर्व-पश्चिम असे दोन भाग झाले. त्या पैकी इ.स. ४७६ मधे पश्चिमेकडील साम्राज्य गडगडलं. तर पूर्वेकडील भाग इ.स. १४४३ मधे.. मुस्लिमांनी कॉन्स्टानटीनोपल (आजचं इस्तंबूल) जिंकल्यामुळे! रोमच्या राज्यकर्त्यांनी ख्रिस्ती संप्रदायाचा स्वीकार करून सक्तीनं आपल्या नागरिकांचं धर्मांतर सुरु केल्यानं रोमन साम्राज्य गडगडलं. रोमन साम्राज्य गडगडल्यामुळे इ.स. ७०० ते इ.स. १४०० असं ७०० वर्षांचा काळ युरोपने 'काळ्या युगात' घालवला. ख्रिश्चनीटी सोबत आहे, पण अभिजातता म्हणजे classicism.. जनसामान्यात नाही— असा तो ७०० वर्षांचा काळ्या युगाचा काळ. सर्वसामान्य युरोपियन माणूस अभिजातता ऱ्हासाने वेढला गेला त्या काळात..

परंतु काल कितीही अंधःकारमय बनला तरी ज्यांची सकारात्मकता जागी आहे असे विचारी लोक असतातच. त्यांचा आंतरिक कल्याणकारी सर्जनशील प्रकाश त्यांना वात दाखवत असतोच. नेमकं असंच १४व्या-१६व्या शतकादरम्यान इटलीत घडलं. इटलीतल्या समंजस माणसांनी विचार सुरु केला.. 'सामान्य माणसाला अभिजाताततेच्या परिघात कसं आणायचं?— हा त्यांच्या समोरचा प्रश्न होता. खूप विचार करून त्यांनी मागे वळून रोमन साम्राज्याच्या उज्ज्वल काळातील अभिजाततेचा शोध घेतला. अभिजातता म्हणजे रचनात्मकता हे त्यांनी ओळखलं. हे ओळखण्यात अग्रेसर मंडळी होती मायकेल एन्जेलो, दा विंची यांज्सारखी. त्यापेकी कोणी शरीरातील हाडांचा सांगाडा अभ्यासला, कुणी त्या सांगाड्याला लपेटणाऱ्या स्नायूंचा अभ्यास केला.. नुकत्याच पुरलेल्या प्रेतांचं विचेद्द्न करून.. रात्रीच्या अंधारात.. स्मशानात जाऊन! त्या काळातील ख्रिस्ती सांप्रदायिक समजुतीनुसार, हे काम समाजविरोधी होतं. ते काम करण्यात खूप धोका होता. परंतु मध्य काळातील 'बायझंटाइन' चित्रशैलीचं परिवर्तन करून लोकाभिमुख वास्तववादी चित्र चितारण्यासाठी शरीररचनेचा, anatomy चा अभ्यासही गरजेचा होता. त्या सोबत याथादर्शन शास्त्राचा, perspective द्विमितीजन्य चित्र-अवकाशावर त्रिमितीचा आभास निर्माण करणाऱ्या रेखांकानाची पद्धत लिओनार्डो दा विंचीने विकसित केली. मायकेल एन्जेलोने याथादर्शन शास्त्राच्या परिघातील कलात्मक शरीर सौष्ठवाचा विशेष अभ्यास केला. सर्व प्रकारच्या रेखांकन आणि रंग माध्यमांची निर्मिती सर्वांनीच केली. या साऱ्या प्रयत्नांमधून लोकाभिमुख वास्तववादी चित्रकलेचं जन्म झाला. उच्च कलात्मक मूल्य सर्वसामान्य माणसाच्या परिघात पोहोचवण्याच्या कार्याला पुनर्जागृती पर्व renaissance पर्व मानलं गेलं.

- चित्रकार रवी परांजपे

( भारत : काल आज आणि उद्या )



’I painted in the hope of taking the viewer on a voyage through the painting; hoped too,
that there he would forget himself.’

Wassily Kandinsky



# वॅस्सिल्ली कॅन्डीन्स्की


कोणत्याही क्षेत्रात ज्यावेळी मतभिन्नता निर्माण होते आणि दोन पक्ष अस्तित्वात येऊन त्यातून एक तणाव उत्पन्न होतो, त्यावेळी त्या क्षेत्रातली विचारी लोकं नेहमीच विवेकाची कास धरत समन्वयाची भूमिका मांडताना आढळतात, कारण या समन्वयवादी भूमिकेतच त्या क्षेत्राची एकात्मता कायम राखण्याची व त्या क्षेत्रात नवे आणि चांगले काही घडवण्याची क्षमता असते. आपल्या महाराष्ट्रातलंच एक उदाहरण पहा. सुमारे सातशे वर्षांपूर्वी येथील अध्यात्म क्षेत्रात एक असाच तणाव निर्माण झाला. पूजाअर्चा व कर्मकांड यांवर आधारित सगुण भक्ती श्रेष्ठ असे मानणारा एक पक्ष आपले हितसंबंध अबाधित राखू इच्छित होता; तर योगचिंतनावर आधारित निर्गुण भक्ती श्रेष्ठ असे मानणारा एक पक्ष आपले वेगळेपण सिद्ध करण्याच्या धडपडीत होता. अशा वेळी सर्वसाधारण समाजाच्या श्रद्धांनाच तडा जाणार की काय, अशी परिस्थिती निर्माण होत असतानाच एक महापुरुष या भूमीत अवतरला — संत ज्ञानेश्वर महाराज.

ज्ञानेश्वरांनी 'सगुण निर्गूण दोन्ही विलक्षण' असे सांगत समन्वयाचा संदेश दिला आणि समस्त मराठीजनांची मने जोडत त्यांच्या नंतरची सारी दैदिप्यमान अशी एकात्म संतकवी परंपरा त्यांनी महाराष्ट्रात उभी केली.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात फ्रान्स मधे पहिले छायाचित्र अस्तित्वात आले आणि निसर्ग, व्यक्ती, व्याक्तीसमूह, वास्तू किंवा दृष्य जगातले काहीही, यांची हुबेहूब प्रतिमा, चित्रकाराला दूर ठेऊन मिळण्याची सोय प्रथमच उपलब्ध झाली. या घटनेने फ्रेंच कलाविश्वात जे पडसाद उमटले, त्यात काही महत्वाचे प्रश्न उभे राहिले. चित्राचे नेमके प्रयोजन काय? चित्रविषयाचे हुबेहूब दर्शन चित्रात घडवणे एवढेच चित्रकाराचे काम ठरते का? की चित्राचा चित्रकाराला होणाऱ्या दृक-संवेदनांशी काही संबंध आहे? अशा प्रश्नांनी अस्वस्थ होणाऱ्या चित्रकारांनी सुमारे दहा वर्ष चाललेल्या विचारसत्रानंतर १८७४ मध्ये या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या इराद्याने impressionism चा मार्ग निश्चित केला.







हा मार्ग मात्र काटेरी होता. राजाश्रयाला चटावलेल्या, स्वहित-संबंधांच्या बाबतीत दक्ष असलेल्या रूढीवादी प्रस्थापितांबरोबरील संघर्षाचा होता. या जीवघेण्या संघर्षाअंती ज्यावेळी इम्प्रेशनिझम आकारास आला, त्या वेळी इम्प्रेशनीस्ट चित्रकारांनी एक ऐतिहासिक जबाबदारीच पार पाडली होती. ही जबाबदारी होती, तोवरचे चित्रसंचित नव्या मिथक निर्मितीने समृद्ध करण्याची. ही जबाबदारी होती रूढी बाजूला सारून चित्रकलेची वर्षानुवर्षांची मिथक निर्मितीची परंपरा पुढे नेण्याची; आणि ही जबाबदारी होती नवे, खरे निकष नव्याने प्रस्थापित करण्याची. इम्प्रेशनीस्ट चित्रकारांनी या सर्व जबाबदाऱ्या अतिशय निष्ठेने पार पाडल्या. फक्त अन्य एक जबाबदारी त्यांना नीट पार पाडता आली नाही. ही जबाबदारी होती परंपरेचा खरा अर्थ नीट समजावून सांगण्याची. साहजिकच त्यांच्यासमवेत असलेल्या लेखकांनीही परंपरेचा प्रागतिक अर्थ नीट ओळखला नाही आणि त्यामुळे परंपरा आणि तत्कालीन रूढी यांची गल्लत होऊन रूढी विरुद्ध परंपरा अशा मूळच्या संघर्षाचे रूपांतर चित्रकलेतील 'प्रागतिक आणि अप्रागातिक' अशा असहिष्णू जाती निर्माण होण्यात झाले. मुक्ततेच्या दिशेने पहिलेच पाऊल पडत असताना चित्रकलेच्या एकात्मतेला गेलेला हा तडा आजही तसाच टिकून राहिला आहे.

चित्रकलेतील ही जातिव्यवस्था दृढ करीत इम्प्रेशनिझम १८७४ ते १८८६ अशी बारा वर्ष टिकला आणि त्यानंतर १८७४ ते १८८६ अशी बारा वर्ष टिकला आणि त्यानंतर १८८८६ ते १९०८ या केवळ बावीस वर्षांच्या काळात विलक्षण वेगाने निओ-इम्प्रेशनिझम, सिंथेटीसिझम, सिम्बोलीझम, पोस्ट इम्प्रेशनिझम, आर्ख नुवो, फौविझम आणि क्युबिझम अशा शैली आपापले निकष घेऊन निर्माण झाल्या. यापैकी बहुतेक शैलीनी हीच जातिव्यवस्था पुढे रेटत इम्प्रेशनिझमला अप्रागातिक ठरवले आणि विसाव्या शतकात हा 'नवशैली' प्रवास ज्यावेळी क्युबिझम नंतर analytical क्युबिझम, सिंथेटिक क्युबिझम असे टप्पे गाठत तितक्याच झपाट्याने पुढे सरकला, त्या वेळी इम्प्रेशनिझम पासून फौविझम पर्यंतच्या सर्वच शैली अप्रागातिक ठरवण्याची जणू चढाओढच सुरु झाली. साहित्यिकांच्या आजच्या ज्येष्ठ पिढीतील नामवंतांच्या कर्तृत्वाचा 'तण' म्हणून उल्लेख त्यांच्या नंतरच्या कुणी करावा, अशापैकी हा सारा प्रकार होता.

असे असूनही इम्प्रेशनिझम ते ब्राखच्या क्युबिझम पर्यंतच्या शैलींमधे आढळणारी कमीअधिक प्रमाणातली सुबोधता हा या साऱ्या शैलींना जोडणारा महत्वाचा धागा होता. परंतु, सिंथेटिक क्युबिझम पासून पुढे अमूर्तवादी (abstract) चित्रकलेपर्यंतचा टप्पा गाठला जात असता या सुबोधतेच्या धाग्यालाच बरबाद ठरवले जाऊ लागले. अमूर्तवादी कलेच्या संदर्भात आता चित्रकलेच्या फक्त दोन जाती होत्या. रंग, रेषा, आकार, अवकाश, आणि पोत, यांखेरीज दृष्य जगतातील कशाशीही नाते न ठेवणारी non-repressentional किंवा subjective अशी अमूर्तवादी कला ही एक प्रागतिक जात मानली गेली व इतर सर्व सुबोध कलाशैलींचे गाठोडे बांधून त्याला repressentional किंवा objective असे संबोधित त्यावर अप्रगतिकतेचा शिक्का मारण्यात आला. या परीस्थितीत चित्रकारांमध्ये जागृत झालेले अहंकार आणि अभिनिवेश यांनी सारे चित्रकला विश्व नंतर पूर्ण पोखरले गेले.

आणि नेमक्या अशा क्षणी, अध्यात्मिक प्रवृत्तीचा आणि हळूहळू अमूर्तवादी कलेकडे अधिक अधिक झुकू लागलेला एक चित्रकार उभा राहिला आणि त्याने जवळजवळ ज्ञानेश्वरांच्या थाटातच चित्रकलेच्या एकात्मतेचा संदेश देताना सांगितलं, ‘That the artist turns to the real or the abstract, is of little importance, because both are at heart the same.' साऱ्या चित्रनिर्मितीचं सार ओळखणाऱ्या या चित्रकाराचं नाव होतं— वॅस्सिल्ली कॅन्डीन्स्की (Wassily Kandinsky).











*'That the artist turns to the real or the abstract, is of little importance, because both are at heart the same.'*

कॅन्डीन्स्की चा जन्म ४ डिसेंबर, १८८६ या दिवशी रशियातील मॉस्को या शहरात एका साधन कुटुंबात झाला. अनेक चित्रकारांच्या बाबतीत त्यांच्या लहानपणचा एखादा अनुभव त्यांच्या कलाजीवनात महत्वाची भूमिका पार पाडताना आढळतो. कॅन्डीन्स्कीच्या बालपणी त्याने पाहिलेल्या मॉस्कोच्या सायंकालीन क्षितीजरेषेवरील लालीने त्याच्या मनावर खोल परिणाम केला होता आणि हा लाल रंग एखाद्या पार्श्वसंगीतातील धूनेप्रमाणे त्याच्या बहुतेक चित्रात पुढे फिरत राहिला. नंतर आढळून येणारी त्याची रंगांची जाण आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण रंगविचार यांचे मूळही कॅन्डीन्स्कीच्या बालपणाच्या या अनुभवात बहुदा दडलेले असावे. त्यांने पुढे लिहिले — 'Colour is the keyboard, the eye is the force that strikes and the soul is that instrument with a thousand strings.'

शालेय शिक्षणानंतर मॉस्को विद्यापीठात कायदा व अर्थशास्त्र या विषयांच्या अभ्यासात रमलेला व पुढे तिथेच प्राध्यापक म्हणून रुजू झालेला कॅन्डीन्स्की काहीसा उशिरा चित्रकलेकडे वळावा हे सुद्धा 'मातीस' च्या बाबतीत घडले त्याप्रमाणे, नियतीनेच ठरवले असावे. मॉस्को विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञांच्या एका तुकडीबरोबर तो १८८९ मधे सेंट पीटर्सबर्ग येथे गेला असता तेथे भरलेले प्रसिद्ध डच चित्रकार रेम्ब्रांट यांचे प्रदर्शन पाहून तो अतिशय प्रभावित झाला. छाया-प्रकाशाच्या वैशिष्ट्यपूर्ण खेळाद्वारे आपले भावविश्व आपल्या चित्रातून रसिकांपर्यंत पोचवण्याचे रेम्ब्रांटचे सामर्थ्य पाहून तो अवाक् झाला आणि अंतर्मुखही बनला.

या अंतर्मुख होण्यात कॅन्डीन्स्कीची चित्रकार बनण्याची मनीषा मूळ धरू लागली होती, परंतु एक अडचण त्याला सतावत होती. कायदा व अर्थशास्त्र असे विषय शिकवताना प्रत्यक्षवाद (positivism) त्याच्या रोमारोमात इतका भिनला होता,की त्याची मूळची काहीशी धार्मिक प्रवृत्ती केव्हाच लोप पावलेली त्याला स्मरत होती. अशा या प्रत्यक्षवादाची व कोणतेच रंगरूप नसलेल्या भावविश्वाची सांगड कशी घालायची? अशा एका यक्षप्रश्नाने त्याच्या मनात घर केलं. अशातच मॉस्को विद्यापिठातल्या सेवेतली पाच-सहा वर्षे निघून गेली आणि नियतीने ठरवलेला तो निर्णायक परिवर्तनाचा क्षण उजाडला.

मॉस्को येथे भरलेल्या फ्रेंच चित्रकला प्रदर्शनाने हा क्षण आणला होता. या प्रदर्शनात कॅन्डीन्स्कीने इम्प्रेशनिस्ट चित्रकारांच्या कलाकृती पाहिल्या. त्या प्रदर्शनातील क्लोद मोनेच्या 'HayStacks' या शीर्षकाच्या जगप्रसिद्ध चित्रांनी त्याला अक्षरश: वेडे केले. मोनेच्या चित्रातील वातावरणात विरघळू पाहणारे आकार व अशा आकारांतून शीतोष्ण रंगांच्या सोबतीने साकारणारी स्वप्नसृष्टी कॅन्डीन्स्कीबरोबर एक आंतरिक संवाद साधू पहात होती. चित्रनिर्मितीची गरज म्हणून निवडलेला चित्रविषय नंतर विसरायचा असतो व सारे लक्ष नंतर त्यातून एक प्रकारचे दृक-संगीत निर्माण करण्याकडे द्यावयाचे असते, हा संदेश उमगण्यास मोनेचे रंगवैभव पाहून थक्क झालेल्या कॅन्डीन्स्कीला फारसा वेळ लागला नाही. मोनेच्या चित्राने दिलेली ही उमज कॅन्डीन्स्कीच्या बाबतीत निश्चित असा परिणाम साधणारी ठरली. कारण पाठोपाठच्या वर्षी त्याने मॉस्को विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातली आपली जबाबदारी सोडली व एका वेगळ्याच विश्वात दाखल होण्याच्या इराद्याने त्याने जर्मनीतील म्युनिक हे शहर गाठले. हे विश्व होते रंगांच्या वैभवाचे, भावस्पर्शी रेषांचे, आकार सौष्ठवाचे, लावण्यकारक अवकाशाचे आणि हृदयाला स्पर्शणाऱ्या पोतांचे. समाजशास्त्राचा अभ्यास करताना स्वीकारलेल्या प्रत्यक्षवादाच्या प्रभावाखाली कॅन्डीन्स्कीने ज्या धार्मिक व अध्यात्मिक प्रवृत्तींचा त्याग केला होता, तिची जागा भरून काढणारे पवित्र, मंगल असे काहीतरी आपल्या हाती लागणार असा भरवसा या विश्वात त्याला आता मिळू लागला.



‘म्युनिक अकॅडमी ऑफ फाईन आर्ट्स' या संस्थेत अन्तोन अझबे आणि फ्रान्झ व्हॉन स्टुक यांच्या मार्गदर्शनाखाली, पॉल क्लीच्या (पुढे जगप्रसिद्ध झालेला थोर स्विस चित्रकार) सोबतीने आपल्या चित्रकला शिक्षणात व्यग्र झालेल्या कॅन्डीन्स्कीने आपल्या अन्तःप्रेरणांना वाव देत इम्प्रेशनिझम, सिम्बोलीझम, आर्ख नुवो, फौवीझम अशा विविध शैलींचा अभ्यास केला. ट्युनिशिया, इटली, फ्रान्स व हॉलंड या देशात जाऊन त्याने नवे संस्कार स्वतःवर घडवले व १९०८ आणि १९०९ या वर्षी मर्नाव (Murnau) या ठिकाणी केलेल्या निसर्गचित्रातून आपली अमूर्तवादी चित्रकलेच्या दिशेने सुरु झालेली वाटचाल सिद्ध करत भरीव अशी चित्रनिर्मिती केली.

चित्रकला शिक्षणार्थ म्युनिक ला आल्यानंतर कॅन्डीन्स्की ज्या स्थित्यंतरातून गेला ती सारी स्थित्यंतरे म्हणजे संथपणे चालू झालेली आत्मशोधाची प्रक्रिया होती. या प्रक्रियेत कॅन्डीन्स्कीने जवळ केलेला व अमूर्तवादी चित्रकलेकडे नेणारा शेवटचा फौविझमचा टप्पा जेवढा महत्वाचा आहे, तेवढाच महत्वाचा त्या स्थित्यंतरातील पहिला इम्प्रेशनिझमचा टप्पाही होता. 'Every process is sacred if it is necessary to the inner man— कॅन्डीन्स्कीने एकदा सांगितलं होतं. या आत्मशोधाच्या प्रक्रियेत कॅन्डीन्स्कीची अस्सल स्वरूपाची चित्रनिर्मिती तर बाहेर आलीच, पण त्याच्या परिपक्व, उदार व अभिनिवेशाचा वासही नसलेल्या सुस्पष्ट कलाविचारांनी आधुनिक कलेला कायमचे उपकृत केले.

'I painted in the hope of taking the viewer on a voyage through the painting; hoped too, that there he would forget himself.' हा असाच एक परिपक्व विचार कॅन्डीन्स्कीने मांडला व १९११ मधे त्याने ब्लाऊ रायटर ('Der Blaue Reiter' —The Blue Rider) या समविचारी चित्रकार समूहाची स्थापना केली. काव्यात्म व प्रतीकवादी आशयाची चित्रे निर्माण करणाऱ्या या ब्लाऊ रायटर समुहात कॅन्डीन्स्की खेरीज आपल्या वेगवेगळ्या मार्गाने केवळ रंग आणि आकारांमार्फत आपले भावविश्व चित्रात उभे करणारे इतर कलावंत होते— ऑगस्ट मार्क, अलेक्सी जोलीन्क्सी, फ्रान्झ मार्क आणि पॉल क्ली. सामाजिक व्यथा आणि भावनांचा आक्रोश यांपासून मात्र 'ब्लाऊ रायटर' चळवळ दूर राहिली.

कॅन्डीन्स्कीने 'Concerning The Spiriual in Art' हे अतिशय महत्वाचं लेखन केलं  व त्याच बरोबर स्वतःच्या चित्रांचे प्रदर्शनही त्याने म्युनिक येथे भरवले. १९१४ मधे पहिले महायुद्ध सुरु झाले आणि कॅन्डीन्स्कीला जर्मनी सोडून जावे लागले. काही काळ स्कॅनडीनेव्हीया भागात काढून त्याने त्याच वर्षी पुन्हा मायदेश गाठला. १९१७ मधे रशियात राज्यक्रांती होऊन पहिले साम्यवादी सरकार आले, आणि परिस्थिती स्थिरस्थावर होताच ज्या नेमणुका झाल्या त्यात कॅन्डीन्स्कीची मॉस्कोच्या 'फाईन आर्ट्स अकॅडमी' या संस्थेत प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. १९१९ मधे रशियातील अनेक चित्र-संग्रहालयांच्या उभारणीत त्याने महत्वाचे योगदान दिले. १९२० मधे कॅन्डीन्स्कीची मॉस्को विद्यापीठात चित्र-शिल्प विभागात प्राध्यापक या नात्याने नेमणूक झाली. कॅन्डीन्स्कीच्या चित्रांचे सरकारपुरस्कृत सिंहावलोकनी प्रदर्शन मॉस्कोत भरले ते याच वर्षी. या साऱ्या घटना जरी मनाजोग्या घडत होत्या, तरी कॅन्डीन्स्की एका बाजूने काहीसा अस्वस्थ होता. मॉस्को विद्यापीठातील काही प्रबळ सहकाऱ्यांबरोबर त्याचे चित्रकलेच्या बाबतीत तात्विक मतभेद होऊ लागले. उपयुक्ततावादी constructivist कलाकारांना कॅन्डीन्स्कीला अभिप्रेत असलेली अध्यामिकता नामंजूर होती.  त्यामुळे १९२१ मधे कॅन्डीन्स्कीने मॉस्को सोडून पुन्हा जर्मनीला जाण्याचा निर्णय घेतला. मॉस्को शहराबरोबरची त्याची ही ताटातूट मात्र कायमची ठरली.

कॅन्डीन्स्कीचा वर्गमित्र असलेला पॉल क्ली ज्या संस्थेत प्राध्यापकपदी नियुक्त झाला होता, त्याच जगप्रसिद्ध बाऊहास (Bauhaus) या कलासंस्थेत म्युनिकला परतलेल्या कॅन्डीन्स्कीचीही प्राध्यापकपदी नियुक्ती झाली. कालांतराने त्याच संस्थेच्या उपाध्यक्ष पदापर्यंत तो पोचला. १९३३ मधे नाझी मंडळींनी बाऊहास बंद पाडेपर्यंत तो तेथेच कार्यरत राहिला.

बाऊहास बंद पडताच कॅन्डीन्स्कीने आपला मुक्काम फ्रान्समधे हलवला. आपले सारे म्हातारपण पॅरीस येथे घालविणाऱ्या या थोर चित्रकाराने १३ डिसेंबर १९४४ रोजी या जगाचा निरोप घेतला.





'Colour is the keyboard,
the eye is the force that strikes and
the soul is that instrument with a
thousand strings.'

चित्रकला क्षेत्राला विसाव्या शतकात एकात्मतेचा संदेश देणाऱ्या या आधुनिक ज्ञानेश्वराने जे टप्पे गाठत रंग-रेषांची आत्मिक शिखरे गाठली, त्या टप्प्यांचा मागोवा घेणे आवश्यक आहे. रेम्ब्रांट आणि क्लोद मोने यांचे ऋण मानत कॅन्डीन्स्कीने म्युनिक येथील अकॅडमीत केलेल्या अभ्यासानंतर १९०० ते १९१० या काळातील त्याच्या चित्रांत हेन्री मातीसच्या फौवीझमचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. परंतु या दशकाच्या शेवटच्या दोन वर्षातील त्याच्या निसर्गचित्रांत काही आकारांचे सहजपणे झालेले विघटन व त्याच विघटीत आकारातून डोकावणारे उजळ रंग कॅन्डीन्स्कीच्या अमूर्तभावदर्शक, आत्मिक ऊर्मीची झलक दाखवितात. १९१० ते १९२० च्या काळात हीच उर्मी अधिक मुक्तपणे उसळणाऱ्या लहान-मोठ्या विविधरंगी कारंज्यांना येऊन चित्रांत कॅन्डीन्स्कीच्या वाट मोकळी करून देते. नंतर तितक्याच स्वैरपणे संचार करू पाहणाऱ्या काळ्या, करड्या, किंवा इतर रंगांच्या जाड व हलक्या रेषा या रंगीत कारंज्याना येऊन मिळतात. अशावेळी आधीच्या दशकात कॅन्डीन्स्कीने केलेला सारा आत्मशोध उत्स्फूर्तपणे प्रकट होताना आढळतो. ब्राख आणि पिकासो यांचा क्युबिझम ज्या काळात आकारास येत होता, त्याच काळात कॅन्डीन्स्की क्युबिझमनंतरच्या अमूर्तभावदर्शक चित्रांच्या टप्प्यावर पोचावा याचे क्षणभर आश्चर्य वाटते.

१९२० ते १९३० या दशकात कॅन्डीन्स्कीच्या आयुष्यात झालेले परिवर्तन त्याच्या चित्रांतही उतरलेले आढळते. आधीच्या दशकात त्याच्या चित्रांत मुक्तपणे उसळणारी रंगांची कारंजी आणि स्वैरपणे फिरणाऱ्या रेषा आता गायब झालेल्या दिसतात. या दशकात त्यांची जागा अर्धवर्तुळे, वर्तुळे, चौरस, आयात, त्रिकोण व सरळ रेषा असे भौमितिक आकार घेतात. उजळ रंगांना आपलेसे करणारे हे भौमितिक आकार नंतर काही वेळा कॅन्डीन्स्कीच्या चित्रांमधील काळ्या पार्श्वभूमीच्या कोंदणातही जाऊन बसतात. कॅन्डीन्स्कीच्या आगळ्यावेगळ्या लावण्य विचारांची शाल पांघरणारी त्याची चित्र मांडणी, क्वचित प्रसंगी या भौमितिक आकारांतून सूचित होणारे एखादे आत्मिक आनंद देणारे दृश्यही आपल्या डोळ्यांसमोर तरळत ठेवते. 'बाऊहास' या कला संस्थेतील कलाप्रवाहांचा प्रभावही या काळातील त्याच्या चित्रांत आढळतो.

१९३० नंतरचा काळ हा कॅन्डीन्स्कीच्या म्हतारपणाचा काळ होता. या वयातही त्याने केलेले नवे प्रयोग पाहून स्तिमित व्हावयास होतं. या प्रयोगात त्याचे भौमितिक आकार आता प्रतिकांची भूमिका बजावताना आढळतात. कधी हे प्रयोग इजिप्शियन कलेची आठवण करून देतात, कधी सूक्ष्म दुर्बिणीतून दिसणार्या जीवसृष्टीतील प्रतिमा या प्रयोगात डोकावतात, तर कधी या प्रायोगिक चित्रांत लहान मोठ्या वाद्यांचा एक वाद्यवृन्द्च जणू आपल्यासमोर एखादी धून पेश करत आहे, असे वाटू लागते.

परंतु कॅन्डीन्स्कीच्या साऱ्या चित्रांतून पेश होणारी ही धून काहीशा 'अनवट' वाटणाऱ्या रागात बांधलेली होती, हे मान्य करावे लागेल. असे असूनही हे 'अनवट' राग 'दृक-ख्यालगायकी' च्या घाटाच्या मर्यादा ओलांडताना कधीही दिसत नाहीत. चित्रकलेच्या स्वयत्ततेतील अनुशासनाचा अर्थ सांगणारा, सेजान सारख्या चित्रकारालाही अभिप्रेत असलेला 'Law of Harmony' कॅन्डीन्स्कीच्या चित्रांनाही लागू पडत असलेला दिसतो आणि म्हणूनच त्याची चित्रे एका दृष्टीने दुर्बोध असूनही चित्ररसिकांना गुंतवून ठेवतात. रसिकांची उत्सुकता वाढवतात.

कॅन्डीन्स्कीने दिलेला चित्रकलेच्या एकात्मतेचा संदेश त्याच्या नंतरच्या पन्नास वर्षात जगभरच्या 'अभिजात' कला क्षेत्रातील मंडळींना कितपत रुचला, पटला, हे सांगणे मोठे मुश्कील आहे. कारण चित्रविक्रेत्यांनी रचलेली जी एक व्यापारी व्यूहरचना चित्रकलाक्षेत्राच्या मानगुटीवर कॅन्डीन्स्कीच्या काळातच बसली, ज्या व्युहरचनेला पिकासो आणि अन्य मान्यवर आधुनिक चित्रकारांनी बळ दिले, त्या व्यूहरचनेत चित्रकलेच्या एकात्मतेला फारसा अर्थच राहिला नाही. ५० वर्षात तर या व्यूहरचनेत चित्रकलेच्या एकात्मतेच्या जोडीने तिच्या स्वयत्ततेवरही मर्यादा आलेल्या जाणवतात. सर्वात दुर्दैवाची गोष्ट अशी की, या व्यूहरचनेत चित्रकलेतल्या सुसंवादाला, एकात्मतेला व स्वयात्ततेला डावलून तिला 'अभिजात' ठरवण्याचं तंत्रही विकसित होत गेलेलं आज आढळत आहे.

पण या व्यापारी व्यूहरचनेमार्फत होणाऱ्या दुस्वासाचे धनी होऊनही जगभरच्या बोधचित्रकारांनी कॅन्डीन्स्कीचा एकात्मतेचा संदेश शिरोधारी ठेवत रंग-रेषांच्या शिखरांची जी उंची गेल्या सत्तर-ऐंशी वर्षात गाठलेली आढळते तिला तोड नाही, असेच आज दिसत आहे.

रवी परांजपे
(शिखरे, रंग रेषांची)

.............................................................................................................................................

**चित्रकलेतील मिथकनिर्मितीची परंपरा म्हणजे काय?**

चित्रकलेच्या पूर्वसंचिताला नव्या ज्ञानाची, तंत्रज्ञानाची, नव्या कालात्माक निर्णयांची जोड देऊन नव्या तत्वप्रणालींना किंवा शैलीना जन्म देण्याची परंपरा. सर्वसामान्य अशा दृक-वास्तवाचे — सत्यम, शिवम आणि सुंदरम — अशा पातळीवर पोचणारे व पोचवणारे चित्ररूप परिवर्तन घडवू शकणारे कलाकार या परंपरेला आजवर पुढे नेत आले. मूर्त आणि अमूर्त तत्वांचा चित्ररूप सुसंवाद निर्माण करणे हे या परंपरेचे शाश्वत उद्दिष्ट ठरले आहे.
Renaissance काळात (१५ वे शतक) पाश्चात्य कलेला तोवर ज्ञात नसलेला यथार्थदर्शन शास्त्र (perspective) व शरीरशास्त्र (anatomy) यांची जोड लाभली आणि आभासात्मक वास्तववादी चित्रशैलीचा जन्म झाला.
१९ व्या शतकाच्या शेवटी सूर्य प्रकाशाबाबतच्या शास्त्रीय शोधातून ज्ञात झालेल्या उजळ शीतोष्ण रंगांच्या भानाची जोड चित्रकारांनी वास्तववादी चित्रकलेला प्रथमच दिली. आणि त्यातून सूर्यप्रकाशात न्हाऊन निघणारा सरकता क्षण टिपणारा, सर्वसामान्य जनजीवनातली गती चित्रित करणारा 'इम्प्रेशनिझम' आकारास आला.
नवी मिथके (वास्तववाद, इम्प्रेशनिझम ई.) शोधली जाणे, कालांतराने या मिथकांचे चित्रकलेच्या पूर्वसंचितरुपी वास्तवात विरघळून जाणे आणि पुन्हा नव्या मिथकांच्या शोधांची गरज निर्माण होणे, ही नित्य चालू राहिलेली साखळीवजा प्रक्रिया म्हणजे चित्रकलेतील मिथकनिर्मितीची परंपरा.



# *Glimpses of past and future activities of 'The Ravi Paranjape Studio.'*

*It is a pleasure to present the special edition of Visual Melody as we conclude the year 2024. In this edition, we featured two previously published articles by Artist Ravi Paranjape tracing the roots of Western Classicism and abstract art. Looking forward to bringing exciting content for you in 2025.*

***Year At-A-Glance at The Ravi Paranjape Studio:***

*Undoubtedly the major milestone of the year is the much deserved inclusion of Paranjape Sir's art collection in the Maharashtra state's Department of Archaeology and Museums' collection.*

*A celebratory exhibition of select works from this collection titled 'Soundarya Srishti' was held at Chatrapati Shivaji Sangrahalay in Satara. A complete account of the event and pictures are available at www.raviparanjape.org/soundarya-srishti*

- *World Art Day' was celebrated at the studio for the first time by showcasing the art of the students and The Sunday Sketch Club members.*
- *Artists Chaitanya Kubal and Vinayak Chhatre offered several successful art workshops like Ganesh idol making, charcoal, and soft pastels.*
- *The year began with a refreshing exhibition of photography by three renowned photographers Milind Dhere, Hemant Medhi, and Abhijit Vaidya from Pune, followed by paintings exhibitions by Artist Atesh Patil and Architect Rajendra Harale.*
- *Another big achievement is that all eight books authored by artist Ravi Paranjape are now available in e-book format on Amazon worldwide. E-books make reading easy and extremely convenient. Check out the e-books at www.raviparanjape.org/ebooks*
- *The 'Sunday Sketch Club' is expanding beyond the physical boundaries of the studio, with several people joining the club's WhatsApp group and sharing their work. All individuals interested in sketching and drawing are welcome to join the 'Sunday Sketch Club,' regardless of their skill level.*
- *The new activity of the 'Library Time' exclusive to the SSC members is gaining popularity! The Club patrons get exclusive access to a curated collection of books every first Sunday of the month. Join the Sunday Sketch Club, details at www.raviparanjape.org*

*Wishing everyone a great year ahead!*

*We have exciting events coming up throughout the year. Follow www.facebook.com/theraviparanjapestudio and Instagram @theraviparanjapestudio for the latest announcements.*

*Representative,*
*The Ravi Paranjape Studio*
*www.raviparanjape.org*



# The Sunday Sketch Club

An initiative by **The Ravi Paranjape Studio**

## On Every Sunday 9 am - 11 am
## Open for all

THE RAVI PARANJAPE STUDIO

**The Ravi Paranjpe Studio**


4, Rutika apts., 1098/5A, Model colony, Pune - 41016

Contact: +91 87 66 907 242 / +91 90 96 431 161

Explore **Ravi Paranjape's** books in **Kindle eBook** format!!
**Download today.**

- Read on your smartphone, tablet or computer
- Great for reference

All books available at
https://www.amazon.in



# THE RAVI PARANJAPE STUDIO

# art & gallery exhibition space

600 sq ft indoor art gallery

1000 sq ft of beautifully designed outdoor exhibition space

Ideal for individual or group art shows, workshops, art demos..

Indoor and outdoor spaces are available separately or together

**find your expression!**

Inquire:
11 am to 7 pm
+91 9423562530

abhijatkala@gmail.com
raviparanjape.org

The Ravi Paranjape Studio
1 Rutika Apartments
1098/5-A Model Colony
Shivajinagar, Pune 411016

## Plan a visit to see the gallery and exhibition space

Call/WhatsApp +91 9423562530
abhijatkala@gmail.com



Compliments from

**The Ravi Paranjape Studio, Pune**

For latest events please visit :

www.facebook.com/theraviparanjapestudio

Email: abhijatkala@gmail.com